ग्राम विकास विभाग
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र. ०२२-२२८५०४७१ Email ID : directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./जि.ग्रा.वि.यं / MGNREGA/११५६ /२०२१ दिनांक : १२.०१.२०२१

प्रति,

**कार्यकारी अध्यक्ष,**
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
तथा
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय : घरकुल लाभार्थ्यांना MGNREGA चा लाभ देणे करीता मस्टर वेळेवर काढणेबाबत.**
**संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक : प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि.१९ नोव्हेंबर २०२०**
**२. महा आवास अभियान- ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचना दि. २०.११.२०२०**

केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता वाढविणे या करीता राज्यात उपरोक्त शासन निर्णयान्वये, महा आवास अभियान - ग्रामीण राबविण्यात येत आहे. हे आपणास ज्ञात आहेच.

महा आवास अभियान- ग्रामीण अंर्तगत राज्यास ८ लक्ष घरकुले पूर्ण करण्याचा उदेद्श आहे. परंतु आतापर्यंत केवळ ३० हजारच घरकुले पूर्ण झाली आहेत. यामध्ये प्रधानमंत्री योजना अंतर्गत २० हजार व राज्य पुरस्कृत अंतर्गत १० हजार घरकुले पूर्ण झाली आहेत. अजूनही ७ लाख ७० हजार घरकुले अपूर्ण आहेत. मा. मंत्री ग्राम विकास, व अतिरिक्त मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी ७ जानेवारी २०२१ च्या व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे अभियानाच्या प्रगतीबद्दल असमाधान व्यक्त केले आहे व विहित वेळेत घरकुले पूर्ण करण्याचे सूचना दिल्या आहेत.

सदर अभियाना अंतर्गत विभागनिहाय बैठकादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, MGNREGA अंतर्गत घरकुलाचे अकुशल मजूरीचे मस्टर वेळेवर न काढल्यामुळे व आवास सॉफ्टवर लाभार्थ्यांच्या नोंदणीकरीता जॉबकार्ड काढण्यास विलंब यामुळे मोठया प्रमाणात आवास सॉफ्ट प्रणालीवर घरकुले अपूर्ण दिसत आहेत. यामध्ये-

१) प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनांतर्गत ९१,००० घरकूले ही Delayed Houses मध्ये आहेत. म्हणजेच प्रथम हप्ता वितरीत केल्यानंतर १२ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी करिता घरकुले अपूर्ण आहेत.

२) प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत दुसरा, तिसरा व अंतिम हप्ता वेळेवर दिला जात नाही.

३) राज्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अद्याप मंजूरी न दिलेले घरकुले २,५०,३९८ आहेत. पहिल्या हप्त्यानंतर जोता अपूर्ण अशी १,७१,५६६, जोत्यानंतर सज्ज्या अपूर्ण अशी ३७,३९४, सज्ज्यानंतर अपूर्ण ३८,७८८ व एकूण ६,५१,२१५ घरकुले अपूर्ण आहेत.

४) ग्रामपंचायत / तालुका स्तरावर जॉब कार्ड काढण्यास विलंब

५) तालुका गृहनिर्माण कक्ष तसेच APO MGNREGA, ग्रामसेवक, ग्रामरोजगार सेवक यांच्या मध्ये समन्वयाचा अभाव आहे.

तरी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (MGNREGA)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), गट विकास अधिकारी यांना घरकुलांचे प्रलंबित मस्टर दिनांक १५ जानेवारी पर्यंत मोहिम स्वरुपात काढणेबाबत आपल्यास्तरावरुन सूचना देण्यात याव्यात, तसेच आपल्या स्तरावरुन याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा.

**(डॉ. राजाराम दिघे)**
**संचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र शासन**

प्रत -

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. मा. विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहितीस्तव सादर.
३. मा. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर यांना माहितीस्तव सादर.
४. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.
५. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (MGNREGA) (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.
७. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत), (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.
८. गट विकास अधिकारी, पंचायत समिती ... (सर्व) यांना कार्यवाहीस्तव.